॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

* सुविचार *
आळसात आरंभी सुख वाटते,
पण त्याचा शेवट दु:खात होतो.




■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

SPOT NEWS

## नियोजित काश्मीर टूर रद्द; पर्यटनाला मोठा फटका

● **नागपूर** – जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये काल दहशतवादी हल्ल्याची घटना घडली आहे. यामध्ये २८ जणांचा मृत्यू झाला आहे. दहशतवादी हल्ल्याच्या घटनेनंतर देशातील जवळपास प्रत्येक शहरातून, जिल्ह्यातून मोठ्या संख्येने काश्मीरला जाण्यासंदर्भातले नियोजित टूर्स रद्द केले जात आहेत. लोक आपल्या नियोजनात बदल करत आहेत. दरम्यान, नागपुरातून एकाच दिवसात काश्मीरमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या शेकडो कुटुंबं किंवा ग्रुप्सनी आपले येणाऱ्या दिवसातील टूर्स रद्द केले आहेत. आम्ही आपल्याच देशाच्या एका भागात सुरक्षित नाही आहोत, ही भावना अस्वस्थ करणारी असल्याचे वानखेडे कुटुंबीयांनी सांगितले. वानखेडे कुटुंबातील १२ सदस्य एक आठवड्याच्या काश्मीर टूरला जाणार होते. पहलगाममध्ये ज्या ठिकाणी घटना घडली, त्या ठिकाणी दोन दिवस थांबणार होते. मात्र कालच्या घटनेनंतर त्यांनी फक्त पहलगामच नाही, तर काश्मीरमध्ये जाण्याचा निर्णयच बदलला आहे. आम्हाला आमच्या नियोजित आनंदाला तर मुकावे लागतच आहे, मात्र एका दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीरमधील हजारो गरजू कुटुंबीयांचे पर्यटनापासून होणारे उत्पन्नही त्यांनी गमावले आहे. हेही दुर्दैवी असल्याचे मत वानखेडे कुटुंबीयांनी व्यक्त केले. दहशतवादी हल्ल्याच्या घटनेमुळे जम्मू-काश्मीरच्या पर्यटनाचे शेकडो कोटी रुपयांचे नुकसान होणार असल्याचे बोलले जात आहे. नागपूरसह देशभरातून हजारो ग्रुप्स आणि कुटुंबीयांनी त्यांचे येणा-या दिवसातील काश्मीर टूर रद्द केले आहेत.

## या महिनाखेर जमा होणार लाडक्या बहिणींचे पैसे

● **मुंबई** – अनेक लाडक्या बहिणी सध्या १५०० रुपये खात्यात कधी जमा होतील याच्या प्रतीक्षेत आहेत. अशा बहिणींसाठी एक मोठी बातमी समोर येत असून मंत्री आदिती तटकरे यांनी एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्यात जमा होतील असे म्हटले आहे. दरम्यान, महाराष्ट्र शासनाकडून महिलांसाठी लाडकी बहीण योजना राबवली जात आहे. दर महिन्याला या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यात राज्य सरकारकडून १५००रुपये दिले जातात. मात्र एप्रिल महिना संपत आला तरी अद्याप लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा झालेले नाहीत. त्यामुळे ३० एप्रिलपर्यंत महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये जमा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या लाडक्या बहिणीच्या अर्जांची तपासणी सुरू असून, योजनेच्या निकषांनुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे.

# भारताचा पाकिस्तानवर कायदेशिर स्ट्राईक

## सिंधू जलवाटपाला स्थगिती । भारत सरकारने पाकिस्तानची केली पाणीकोंडी

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना पुढील ४८ तासांत देश सोडण्याचे आदेश दिले. तसेच अटारी वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय भारताने घेतला. त्याही पुढे जाऊन भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिली. हा पाकिस्तानसाठी सर्वात मोठा दणका आहे. दरम्यान, अतिरेक्यांना धडा शिकवण्यासाठी चोख प्रत्युत्तर देण्याची तयारी भारत सरकारने केली असून, अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी भारतीय लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. एवढेच नव्हे, तर कारवाईसाठी तिन्ही लष्करी दलाला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी मंगळवारी अंदाधुंद गोळीबार केला होता. या गोळीबारात २८ पर्यटकांचा जीव घेतला. हे दहशतवादी पाकिस्तामध्ये परत गेल्याची माहिती आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समिती अर्थात सी सी एस च्या बैठकीत एकंदर सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला तसंच सर्व सैन्यदलांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने सात महत्वाचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. भारताने आता पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलली आहेत. भारताकडून सिंधू जल कराराला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या ८० टक्के पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे.



या निर्णयानुसार भारत आणि पाकिस्तानदरम्यान असलेला, १९६० चा सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत हा निर्णय लागू राहील. अटारी इथली एकात्मिक तपासणी चौकी अर्थात आय सी पी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात आली आहे. १ मे २०२५ पर्यंत वैध प्रवास परवानगी असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना या मार्गाने पाकिस्तानात परतण्याची परवानगी देण्यात आली आहे. या अंतिम मुदतीनंतर, भारत आणि पाकिस्तानमधील जमिनीवरील प्रवास पूर्णपणे स्थगित करण्यात येणार आहे.

पाकिस्तानी नागरिकांसाठी सार्क व्हिसा सवलत योजना रद्द करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांना सार्क सवलत योजना अर्थात SVES अंतर्गत यापुढे भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही; तसंच पाकिस्तानी नागरिकांना पूर्वी जारी करण्यात आलेले सर्व प्रकारचे डतएड व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. तसंच, सध्या या व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्यांना पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत देण्यात आली आहे.

राजनैतिक स्तरावर नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण, सल्लागारांना आठवड्याभरात भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचबरोबर, भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून स्वतःचे संरक्षण, नौदल आणि हवाई सल्लागार मायदेशी परत बोलवण्याची घोषणा केली आहे. दोन्ही उच्चायुक्तालयामधून या सेवा सल्लागारांच्या पाच सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही काढून घेतले जाईल.

भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालय आणि नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील एकूण कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही दूतावासांमधील कर्मचाऱ्यांची संख्या सध्याच्या ५५ वरून ३० पर्यंत कमी केली जाईल. ही कपात १ मे २०२५ पासून लागू केली जाईल. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.

### ४८ तासांत देश सोडा, पाक नागरिकांना आदेश

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज जवळपास अडीच तास चाललेल्या कॅबिनेट कमिटी ऑन सेक्युरिटीच्या बैठकीत पाच प्रमुख निर्णय घेण्यात आले. यावेळी हल्लेखोरांना पाकिस्तानचा पाठिंबा यावरून प्रहार केला. यासंदर्भात पाकिस्तानवर थेट आरोप करीत भारताने पाकिस्तानी दुतावास बंद केला असून, पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द केले. यासोबत सिंधू पाणी कराराला स्थगिती दिली. तसेच अटारी चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णयही घेण्यात आला. सार्क अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आणि त्या अंतर्गत भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडण्यास सांगितले. भारताने इस्लामाबादमधून सल्लागारांनाही परत बोलावले असून, उच्चायुक्तांची संख्या ३० पर्यंत कमी करण्याचा निर्णयही घेण्यात आला. यासंबंधीची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दिली.

## बुलडाणा येथील पर्यटनासाठी गेलेल्या कुटुंबाला पहलगामच्या हॉटेलमालकाने वाचवले

● **बुलडाणा । वीरभूमी**–

जम्मू-काश्मीर येथील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जवळपास २५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश आहे. सुदैवाने बुलडाणा जिल्ह्यातील पाच जणांचा जीव या दुर्घटनेतून बचावला आहे. अचानक फायरिंग सुरू झाल्याने हॉटेलमालकाने त्यांना बाहेर जाण्यापासून थांबवले आणि संपूर्ण कुटुंब बचावले.

निलेश जैन, पारस अरुण जैन, ऋषभ अरुण जैन, सौ. श्वेता निलेश जैन, अनुष्का निलेश जैन अशी बचावलेल्या कुटुंबीयांची नावं आहेत. १८ तारखेला हे कुटुंब मुंबईहून काश्मीरला निघाले होते. जम्मू- काश्मीरमधील सर्व ठिकाणी फिरून झाल्यानंतर २१ तारखेला रात्री पहलगाममध्ये हॉटेलला आले.

२२ ला सकाळी पहलगाममध्ये फिरायला निघणार, तेवढ्यात हॉटेलच्या लोकांनी गोळीबार झाल्याचे व बाहेर न पडण्यास सांगितले. आता हे कुटुंब सुखरूप असल्याची माहिती मिळत आहे. जेव्हा फायरिंग होत होती तेव्हा बुलडाण्यातील कुटुंब तिथेच हॉटेलमध्ये होते. फायरिंगच्या आवाजाने परिवार खूप घाबरला होता.

दुसरीकडे, गोव्यात मडगाव येथे राहणाऱ्या दर्शिता देसाई आणि त्यांचे कुटुंबीय सहलीसाठी काश्मीरला रविवारी पोहोचले.

## काश्मीरमध्ये अडकलेल्या सर्व पर्यटकांना आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था : मुख्यमंत्री फडणवीस

● **मुंबई । वीरभूमी**–

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला आहे. यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. दरम्यान, काश्मीरच्या टूरवर गेलेले अनेक पर्यटक सध्या तिथे अडकले आहेत. याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील सर्व पर्यटकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. याचा सर्व खर्च राज्य सरकार करणार आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे काल (२२ एप्रिल) पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये २८ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात महाराष्ट्रातील एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यात डोंबिवलीच्या तिघांचा समावेश आहे. तर पुण्यातील दोन आणि पनवेलच्या एका पर्यटकाचा मृत्यू झाला आहे. डोंबिवलीचे अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी यांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पनवेलमधील दिलीप देसले यांचाही हल्ल्यात मृत्यू झाला आहे. तर महाराष्ट्रातील एस. बालचंद्रू, सुबोध पाटील, शोबीत पटेल हल्ल्यात जखमी झाले आहेत. दरम्यान, राज्यातील अनेक पर्यटक तिथे पर्यटनासाठी गेले होते. या घटनेनंतर या सर्व पर्यटकांना पुन्हा महाराष्ट्रात यायचं आहे. या सर्व पर्यटकांना राज्यात आणण्याची व्यवस्था राज्य सरकार करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दरम्यान, या दहशतवादी हल्ल्याचा सर्वच स्तरांतून निषेध व्यक्त केला जात आहे. यामध्ये पाकिस्तानचा हात असल्याचे देखील बोलले जात आहे.

दरम्यान, पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमवावे लागलेल्या महाराष्ट्रातील एकूण ६ जणांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली आहे. तर या हल्ल्यात जखमी झालेल्यांना ५०,०० रुपयांची मदत राज्य सरकारने जाहीर केली आहे. महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी एक विशेष विमान वापरण्यात येणार आहे आणि त्याचा खर्च राज्य सरकारतर्फे करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

# पर्यावरणीय तंत्रज्ञानाच्या नवीन प्रकल्पाला चालना

## 'एमआयटी एडीटी'चा जपानच्या 'जी-प्लेस' व 'क्रिस एअरो'सोबत त्रिपक्षीय करार

● **पुणे । वीरभूमी** –

एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी), पुणे यांनी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यापीठाने जपानमधील जी-प्लेस कॉर्पोरेशन आणि पुण्यातील क्रिस एअरो सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्यासोबत एक त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत पर्यावरण अभियांत्रिकी क्षेत्रातील एक नवीन प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत जी-प्लेसने विकसित केलेली 'डोमेस्टिक मल्टी-रिसायकलर' तंत्रज्ञान प्रणाली ज्याला 'जहकासो' या नावानेही ओळखले जाते - ती एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या परिसरात पर्यावरणीय परिस्थितीत चाचणीसाठी बसविण्यात येणार आहे.

करार समारंभप्रसंगी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप तसेच एसओईएसचे संचालक डॉ. वीरेंद्र शेटे उपस्थित होते. क्रिस एअरो सर्व्हिसेसतर्फे व्यवस्थापकीय संचालक दीपक कपाडिया, त्यांच्या पत्नी आणि पुत्र राज कपाडिया यांनी सहभाग घेतला.

ही केवळ एक तांत्रिक भागीदारी नसून स्वच्छ व शाश्वत भविष्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. आमच्या विद्यार्थ्यांना आता जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर काम करण्याची संधी मिळणार असल्याचे एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणेचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी सांगितले.



# SPOT NEWS

## पहेलगाम हल्ला मानवतेला काळीमा फासणारा : बाळासाहेब थोरात

**● संगमनेर । वीरभूमी–**
काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम येथे भारतीय नागरिकांवर झालेला भ्याड हल्ला हा अत्यंत निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारा असल्याची भावना काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे. काश्मीर खोऱ्यातील अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, पहेलगाम येथे झालेला हल्ला हा अत्यंत भ्याड व निंदनीय आहे. यामध्ये निष्पाप २७ भारतीयांचा अतिरेक्यांनी जीव घेतला आहे. ही घटना मानवतेला काळीमा फासणारी आहे. याबाबत सरकारने ठोस उपाय योजना केल्या पाहिजे. केंद्र सरकारने कलमामध्ये बदल केला. ३७० कलम लागू केले यावेळेस सांगितले वेगळे मात्र वस्तूस्थिती वेगळी आहे. अतिरेकी हल्ला आणि देशाची सुरक्षितता याबाबत सरकारने जास्त जागरूक राहण्याची आवश्यकता होती आणि यापुढे राहील अशी भावना व्यक्त करताना पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

## अतिरेकी हल्ले हे कलंक : माजी आ. डॉ. सुधीर तांबे

काश्मीर खोरे हे देशाचे नंदनवन आहे. दरवर्षी हजारो पर्यटक तेथे जातात. मात्र जातीय द्वेष पसरवण्यासाठी काही संघटना अतिरेकी हल्ले करतात यातून निरपराध नागरिकांचा बळी जातो. काल काश्मीरमध्ये २७ नागरिकांचा विनाकारण बळी गेल्या असून ही घटना अत्यंत दुर्दैवी असून मानवतेसाठी कलंक असल्याची प्रतिक्रिया जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा आ. डॉ. सुधीर तांबे यांनी दिली आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सर्व सभासद, शेतकरी व युवकांच्या गुंजाळवाडी, समनापुर, निमोन व तळेगाव दिघे येथे झालेल्या स्नेहसंवाद मेळाव्यात पहेलगाम येथे मृत पावलेल्या २७ भारतीयांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असून या घटनेचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे.

## शासकीय मालमत्तेची चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**● नगर । वीरभूमी–**
मौजे बांगार्डे (ता. श्रीगोंदा) येथील दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप चोरून नेल्याच्या प्रकरणात संबंधित आरोपीवर गुन्हे दाखल करुन आरोपींना पाठिशी घालणाऱ्या ग्रामसेवक व सरपंचांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तक्रारदारांसह ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेत उपोषण केले. या उपोषणात माजी सरपंच घनश्याम शेळके, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विक्रम शेळके, बसपाचे सुनिल ओव्हळ, नितीन जावळे, अंबादास घोडके, विक्रम शेळके, राजू शिंदे, शहानवाज शेख आदींसह ग्रामस्थ सहभागी झाले होते. या आंदोलनास बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. मौजे बांगार्डे येथे तक्रारीनुसार, पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप एका व्यक्तीने चोरून नेऊन स्वतःच्या गोठ्यात वापरले होते. याबाबत पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या आदेशानुसार पंचनामा देखील करण्यात आला. यानंतर संबंधित आरोपी दिनकर शेळके याने सदर पाईप ग्रामपंचायतीकडे परत केले. मात्र शासकीय मालमत्तेची चोरी स्पष्ट असूनही अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

# ब्राम्हणगाव सेवा संस्था पदाधिकारी निवडी बिनविरोध

### अध्यक्षपदी ठकुनाथ आहेर तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब गंगावणे यांच्या निवडी

**● कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील ब्राम्हणगांव सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी कोल्हे गटाचे ठकुनाथ देवराम आहेर तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब नारायण गंगावणे यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार सौ. स्नेहलताताई कोल्हे व युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी अभिनंदन केले आहे. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून सहायक निबंधक एन. जी. ठोंबळ यांनी काम केले.

श्री. ठकुनाथ आहेर यांच्या नावाची सुचना सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक निवृत्ती बनकर यांनी केली तर त्यास दिलीप बनकर यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष पदासाठी बाळासाहेब गंगावणे यांच्या नावाची सुचना दादा आसने यांनी केली तर त्यास सुदाम आहेर यांनी अनुमोदन दिले.

नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्षांचा यावेळी सत्कार करण्यांत आला. सत्कारास उत्तर देतांना अध्यक्ष ठकुनाथ आहेर म्हणाले



की, जिल्हा बँकेचे संचालक विवेक भैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली सभासद शेतकऱ्यांच्या विकासात्मक योजनांची परिपुर्ण अंमलबजावणी करू.

याप्रसंगी सर्वश्री. चांगदेव आहेर, पोपटराव आसने, भास्कर जाधव, अरूण महाजन, पांडुरंग डफाळ, दत्तात्रय सोमासे, काशिगिरी गोसावी, कारभारी सोनवणे, श्रीमती कुसुमताई बनकर, सौ मंगल महाजन, सरपंच अनुराग येवले, मधुकर महाजन, महेश देशमुख, सोमनाथ आसने, जगन्नाथ आहेर, संजय वाकचौरे, आण्णा वाकचौरे, बाबुराव वाकचौरे, अशोक येवले, कचरू जाधव, बाळासाहेब आहेर, ज्ञानदेव जगधने, किशोर आहेर, पोलिस पाटील रविंद्र बनकर, चांगदेव आसने, कारभारी सोनवणे, बाळासाहेब बनकर, संजय वाबळे यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी सचिव भागवत वाकचौरे यांनी आभार मानले.

## रमिज राजे यांना राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार जाहीर

**● पारनेर । वीरभूमी–**
पारनेर येथील सामाजिक कार्यकर्ते गेल्या पाच वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असलेले रमीज राजे यांना कृषी व जनविकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अरुण आंधळे यांनी ही माहिती दिली.

१ मे महाराष्ट्र दिनी दुपारी चार वाजता पारनेर येथील कार्यक्रमात खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते रमीज राजे यांना पारनेर भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे आंधळे यांनी सांगितले. यावेळी राळेगणसिद्धीचे माजी सरपंच सदाशिव मापारी उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



समाजाचे आपण देणे लागतो या भावनेतून रमीज राजे व त्यांचे कुटुंब सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. गेली चार वर्षे कुटुंबातील व्यक्तींच्या वाढदिवसांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून राजे कुटुंब सामाजिक उपक्रम राबवत आहेत. गेल्या चार वर्षांपासून रमीज राजे वाढदिवसानिमित्त रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान या सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून रक्तदान शिबिरांचे आयोजन करीत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांच्या रक्ताची गरज भागली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रतिष्ठानच्या वतीने पारनेर भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे आंधळे म्हणाले.

## पुस्तकामध्ये आयुष्य बदलून टाकण्याची क्षमता

### डॉ. बबन चौरे । बाबुजी आव्हाड महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा

**● पाथर्डी । वीरभूमी–**
पुस्तक वाचनाने मनुष्याच्या व्यक्तीमत्वात प्रचंड बदल होतो. पुस्तके प्रेरणा तर देतातच परंतु ती खरी ज्ञानाची स्त्रोत आहेत. इलेक्ट्रोनिक प्रसार माध्यमे, इंटरनेट व मोबाईलच्या अतिवापरामुळे वाचन कमी होत असून वाचनसंस्कृती हरवत चालली आहे. आज मुले ई-बुकचे वाचन करतात, हा दावा केला जातो. परंतु त्यात तथ्य नसून छापील पुस्तके वाचनात जो आनंद आहे तो ई-बुक मध्ये नाही. आजपासून प्रत्येकाने महिन्याला एक तरी पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा. पुस्तकामध्ये आयुष्य बदलून टाकण्याची क्षमता आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथालय विभाग आयोजित 'मी पुस्तक बोलतोय' या कार्यक्रमात बोलत होते. व्यासपीठावर ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख उपस्थित होते.



डॉ. चौरे म्हणाले, थोर नाटककार व साहित्यिक विल्यम शेक्सपियर आणि इंका गार्सिलासो यांच्या स्मरणार्थ युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. जगभरातील १०० पेक्षा जास्त देशांमध्ये हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. गुगल गुरुचा आधार घेऊन मिळविलेले ज्ञान कधीही परिपूर्ण नसते. पुस्तकासारखा जगात कोणताही दुसरा मित्र नाही. पुस्तके कधीही धोका देत नाहीत. प्रत्येक शाळा महाविद्यालयातून मुलांना दररोज एक तास मुक्तपने वाचन करण्याचा आनंद मिळावा. त्यांना त्यावेळी त्यांच्या आवडीची पुस्तके मिळावीत. प्रत्येक शाळा, महविद्यालयात पुस्तक प्रदर्शन आयोजित करणे, आवडीच्या लेखकांची व्याख्याने, मुलाखती आयोजित करणे, त्यांना बोलते करणे गरजेचे आहे असे ते शेवटी म्हणाले.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी मी पुस्तक बोलतोय या आत्मचरित्रात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या प्रतीक्षा गर्जे, शिरसे मारिया, साधना पवार, प्रियांका लोखंडे, साक्षी सांगळे यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सलीम शेख, सुत्रसंचालन कु ऋतुजा रोडे तर आभार प्रा. सचिन पालवे यांनी मानले.

# सिव्हिल हडको येथील ओढ्यामध्ये मैल मिश्रित पाणी

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात । मनपा आयुक्तांनी केली ओढयांची पाहणी

**● नगर । वीरभूमी–**
सिव्हिल हडको येथील ओढ्यामध्ये नागरिकांनी मैल मिश्रित पाणी सोडल्यामुळे सिव्हिल हडको येथिल ओढ्या शेजारी मोठ्या प्रमाणात नागरिक राहत असून त्यांना तेथे दुर्गंधीचे साम्राज्य व डास मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यामुळे सोडलेले ड्रेनेजचे पाणी बंद करण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले होते या निवेदनाची दखल घेत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी तत्काळ दखल घेत सिव्हिल हडको भारत चौक येथील ओढयाची पाहणी करून नागरिकांना या समस्येतून मार्ग काढू असे आश्वासन दिले.



यावेळी प्रशांत सराईकर, राजेंद्र कचरे, अशोक कर्डिले, विजय आवटी, मुकुंद पालवे, अक्षय सूर्यवंशी, शेखर शेंडे, प्रकाश मारवाडे, उमेश पाठक, शिवम देवगुणे, अमित कचरे, राहुल दरेकर, संजय कचरे, रमेश कांबळे, दिलीप हातवळणे, श्रीकांत नाईक, अलका गाडे, शोभा रणखांब, यशोदा राठोड, उमा सुंबे आदीसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिव्हिल हडको परिसरात मोठी रहदारी असून पारिजात चौक पाईपलाईन रोड येथील नागरिकांनी ड्रेनेज लाईनचे पाणी ओढ्यामध्ये सोडल्याने मोठा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सिव्हिल हडको परिसरात राहणाऱ्या नागरिकांना डेंग्यू, मलेरिया सारखे आजार मोठ्या प्रमाणात होत आहे.

ओढ्यामध्ये सोडलेल्या ड्रेनेजच्या पाण्याची योग्य प्रमाणे विल्हेवाट लावून नागरिकांनी सदरचे मैल मिश्रित पाणी ओढ्यात सोडलेले बंद करून त्यांना ड्रेनेजची स्वतंत्र लाईन टाकण्यात यावी अशी मागणी सिव्हिल हडको येथील नागरिकांनी महापालिकेच्या आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे. अन्यथा येत्या ७ दिवसांमध्ये ओढ्यामधील ड्रेनेज लाईनचे पाणी बंद न केल्यास महानगरपालिकेसमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

## केडगाव येथील नागरिकांच्या वतीने मनपा आयुक्त यांना निवेदन

### पाणीपुरवठा पूर्ण क्षमतेने मुबलक करण्याची मागणी

**● नगर । वीरभूमी–**
अहिल्यानगर महानगरपालिका अंतर्गत केडगाव उपनगर भागात ६ ते ८ दिवसानंतर महापालिका द्वारे पिण्याच्या पाणी चा पुरवठा केला जातो मात्र हा पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने होऊन कमी वेळे पुरता चालू असतो त्यामुळे अनेक घरांना पिण्याचे पाणी भेटत नाही व उन्हाळ्याच्या दिवसात परिसरात पाणीटंचाई झाली असून पाण्याची भटकंती करावी लागत असल्याने महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे केडगाव परिसरातील पाणीपुरवठा हा पूर्ण क्षमतेने देऊन २ दिवसाआड पाणी सोडण्यात यावे व पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी श्री. गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे समवेत बापूसाहेब कोतकर, नवनाथ लोंढे, पांडुरंग कोतकर, मनोहर बगळे, केदार सर, महादेव सातपुते, सचिन कोतकर, अभी ठूबे, राजू हुलगे, शुभम पावसे, अरविंद बहिरकर, परमेश्वर आवटी, राम सरोदे, सागर कराळे, करण परदेशी, ऋषिकेश ठुबे, संदीप भांडारकर, गोरख हुलगे आदीसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हंटले आहे की, पाणीटंचाई व वाढीव पाणीपट्टी वर महानगरपालिका द्वारे या पाणीपट्टी मध्ये वाढ करण्यात आली आहे तरी या वाढीव पाणीपट्टी बाबत विचार करण्यात यावा व केडगाव परिसरामध्ये उच्च दाबाने पाणीपुरवठा २ दिवसाआड करण्यात यावा अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## बोल्हेगावातील बेघर कुटुंबीयांचा घर भेटण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**● नगर । वीरभूमी–**
मौजे बोल्हेगाव गावठाण येथील सर्वे नं.८७/१अ. पैकी क्षेत्र २ हेक्टर ५ आर ही जागा महाराष्ट्र शासनाची असून ती शासनाच्या ताब्यातच आहे. त्या जागेवर मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे १५० ते २०० कुटुंब गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे सुमारे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर रहिवास करत आहे. त्यामुळे त्या जागेवर गोरगरिबांच्या घरकुल योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेसाठी उपयोगात घेऊन योजना राबवण्याची मागणी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी फाउंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे समवेत सतीश साबळे, लक्ष्मण दिवटे, मनीषा शिरसाट, अलका साबळे, जया मोकळ, ललिता लोखंडे, संगीता गाडे, तुकाराम दिवटे, पिंटू तोरडे, प्रीतम अडागळे, आशाबाई पठारे, विशाल लोंढे, आशा मोकळ, जाधव मामा, अण्णा दिवटे, सतीश लोखंडे आदीसह बेघर कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर राहत असून हे कुटुंब बेरोजगार आहे. त्यामधील काही कुटुंबातील व्यक्ती हे भंगार गोळा करतात मजुरी, हमालीचे काम करतात असे वेगवेगळ्या प्रकारे आपले उपजीविका चालवीत आहे. परंतु त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसून हे भाड्याच्या घरात राहून भाडे भरावे लागतात तरी त्यांच्या उपजीविकेत पैसे कधी मिळतात तर कधी मिळत नाही अशा त्यांना भाडे भरणे परवडत नाही तरी बोल्हेगाव गांधीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेली पडीक जागा सुमारे १ एकर रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, यशवंत आवास योजना राबवण्यासाठी घरकुल साठी मिळावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## सोनोशी ग्रामस्थांची भगवानगडाला ७७ लाख रुपये देणगी जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे सोनोशी (ता.पाथर्डी) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ७७ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# दहशतवादी हल्ल्याचा हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून निषेध

### भिंगारमध्ये शोकसभा घेवून बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली । शांतता भंग करणाऱ्यांना ठोस उत्तर देण्याची मागणी

**● नगर । वीरभूमी–**
काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. या हल्ल्यात बळी पडलेल्या २८ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

या शोकसभेसाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, रमेश वराडे, रतनशेठ मेहेत्रे, मेजर दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, जहीर सय्यद, सुधीरशेठ कपाळे, अशोकराव पराते, विलासराव आहेर, सर्वेश सपकाळ, दीपकराव घोडके, अभिजीत सपकाळ, विकास भिंगारदिवे, सरदारसिंग परदेशी, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, दिलीपशेठ गुगळे, प्रकाश देवळालीकर, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, कुमार धतुरे, योगेश चौधरी, मुन्ना वागस्कर, दशरथराव मुंडे, नामदेवराव जावळे, अमोल सकपाळ, संतोष वीर, अनिल शिरसाठ, पंडितजी आदी उपस्थित होते.




संजय सपकाळ म्हणाले की, काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता माजवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताची एकता, शांतता आणि अखंडतेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करत आहे. धर्माच्या नावावर निरपराध नागरिकांवर हल्ला करणे हे केवळ कायरतेचे लक्षण आहे. याचा आम्ही तीव्र निषेध करतो. केंद्र सरकारने अशा हल्ल्यांमागील शक्तींना शोधून काढून कठोर शासन करण्याची मागणी केली.

सभेत सर्वांनी एकमताने हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करत केंद्र सरकारने दहशतवादी संघटनांवर व त्यांना पाठबळ देणाऱ्या शत्रू राष्ट्रांवर कारवाईची मागणी केली. दहशतवाद्यांचा हेतू म्हणजे भीती निर्माण करून समाजात अस्थिरता पसरवणे. मात्र, भारतवासीय एकदिलाने याला प्रत्युत्तर देतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तर सभेच्या अखेरीस उपस्थित सर्वांनी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहिली. तसेच, भविष्यात अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी सरकारने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली.

## पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा कोल्हे परिवाराकडून निषेध

**● कोपरगाव । वीरभूमी–**
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या क्रूर आणि अमानुष दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देशात हळहळ व्यक्त होत आहे. या हल्ल्यात जे निष्पाप पर्यटक नागरिक शहीद झाले, त्यांना संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी या घटनेबाबत तीव्र दुःख व संताप व्यक्त केला असून, या हल्ल्याचा स्पष्ट शब्दांत निषेध केला आहे. या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

दहशतवाद हे मानवतेविरोधी कृत्य असून, अशा हिंसक प्रवृत्तींना कोणतेही स्थान नाही. आपल्या नागरिकांचे हे बलिदान व्यर्थ जाऊ नये, यासाठी देशातील प्रत्येक नागरिक सजग आणि एकजुटीने केंद्र सरकार जी पावले टाकणार आहे त्यासोबत उभे आहेत असे मत कोल्हे कुटुंबीयांनी व्यक्त केले.

केंद्र सरकार आणि सुरक्षा यंत्रणा अशा प्रकारच्या घटनांवर सक्षमपणे नियंत्रण ठेवतील व भविष्यात असे हल्ले पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक ती कठोर पावले उचलतील, यावर आमचा विश्वास आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शाह यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाचा आढावा घेतला आहे.या घटनेनंतर देशाची जी भावना निर्माण झाली आहे, त्यातून ही कृत्य करणाऱ्या दहशतवादाचा बीमोड करणे गरजेचे आहे अशी भूमिका सरकारने घेतली आहे त्यामुळे दहशतवादी कृत्य करणाऱ्यांना योग्य धडा शिकवला जाणार आहे. या घटनेत महाराष्ट्र राज्य सरकार कडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कश्मीरमध्ये अडकलेले पर्यटक सुखरूप परत घेऊन येण्यासाठी मंत्रिमंडळाच्या समवेत कार्यवाही सुरू केली आहे.

## घडाळाच्या दुकानातील चोरीच्या तपासाची चक्रे वेगाने फिरवत, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळा : विवेक कोल्हे

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील सन २०२५ ते २०३० सालच्या ४७ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठीची आरक्षण सोडत आज तहसील कार्यालयात तहसीलदार डॉक्टर सिद्धार्थ कुमार मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या ग्रामपंचायतमध्ये अकोले तालुक्यातील राजकीय दृष्ट्या जागृत असणाऱ्या गावांचा समावेश त्यामुळे या गावातील सरपंचपदासाठी आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या आरक्षण सोडतीमुळे अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भावी सरपंच यांचे आनंदावर विरजण पडले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सरपंच पदासाठी चार गावे, अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरपंच पदासाठी १२, नागरिकांच्या मागास प्रवर्ग सरपंच पदासाठी १३ तर सर्वसाधारण प्रवर्गाच्या १८ गावांच्या सरपंचपदाची सोडत आज काढण्यात आली.

अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सरपंच पदासाठी आरक्षण सोडत सरपंचपदाची गावे – गर्दनी,




निघालेली गावे-रुंभोडी, नवलेवाडी, औरंगपूर व पिंपळगाव निपाणी.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरपंच पदाची गावे – खानापूर, देवठाण, पिंपळगाव खांड, धामणगाव आवारी, लहीत बुद्रुक, जाचकवाडी, तांबोळ, विरगाव, वाघापूर, सुगाव खुर्द, गणोरे व मनोहरपुर.

नागरिकांच्या मागास प्रवर्ग सरपंच पदासाठीचे गावे – कळस बुद्रुक, जांभळे, कुंभेफळ, उंचखडक खुर्द, अंबड, टाकळी, रेडे, लहीत खुर्द, पिंपळदरी, चास, चैतन्यपूर, हिवरगाव व कळंब.

सर्वसाधारण प्रवर्गाच्या गावांच्या ढोकी, इंदूरी, मेंहेंदूरी, बहिरवाडी, डोंगरगाव, सुगाव बुद्रुक, कळस खुर्द, धुमाळवाडी, वाशेरे, परखतपूर, उंचखडक बुद्रुक, मोग्रस, लिंगदेव, बोरी, मन्याळे, बेलापूर व बदगी.

या ४७ ग्रामपंचायतींच्या जाहीर झालेल्या सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीनंतर आता उद्या गुरुवार दिनांक २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी विशाल यादव यांच्या अध्यक्षतेखाली महिला व पुरुष यांचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी नायब तहसीलदार लोहारे यांनी दिली.

## राजूरमध्ये वाढतायत कावीळ रुग्ण ?

### आरोग्य विभागाकडून सर्व्हे । नागरिकांनी घाबरुन जावू नये

**● अकोले । वीरभूमी–**
राजूरमध्ये कावीळ रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने कावीळची साथ आली की काय? यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र तालुका आरोग्य विभागाने कावीळ या आजाराची रुग्ण संख्या राजूर येथे तुरळक प्रमाणात असून काही रुग्ण हे जलजन्य वा विषाणूजन्य आजाराचे असल्याचे सांगत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन केले आहे.

दरम्यान बुधवारी विठा येथील आरोग्य विभागाच्या पथकाने येथे अनेक नागरिकांच्या घरी भेट देत सर्वे केला. यात काही प्रमाणात काविळचे रुग्ण आढळून आले.नागरिकांच्या घरी भेट देत जलजन्य व कावीळ आजारांबाबत मार्गदर्शन करत घ्यावयाची काळजी या बाबत मार्गदर्शन केले.

स्थानिक राजूर येथे मागील तीन चार दिवसांपासून थोडा ताप येणे, मळमळणे, पोटात दुखणे, अशक्तपणा येणे या सारखी लक्षणे असणारे ५ ते २० वर्षे वयोगटातील



रुग्ण राजूर येथीलकाही खाजगी रुग्णालयात १५ ते २० रुग्ण दाखल होत आहे. दाखल होत असलेल्या रुग्णांच्या रक्ताच्या चाचण्या केल्या असता त्यात काविळीचे रुग्ण आढळून आले असल्याचे स्थानिक डॉक्टरांनी सांगितले.

मात्र यातील काही रुग्ण हे विषाणूजन्य आजाराचे असल्याचे सांगत नागरिकांनी घाबरून न जाता पाणी उकळून व थंड करून प्यावे, भाजीपाला स्वच्छ धुऊन घ्यावा, आइस्क्रीम सारखे थंड पदार्थ लहान मुलांना देऊ नये असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ शाम शेटे व विठा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य निरीक्षक शेळके यांनी नागरिकांना केले आहे.

> ग्रामपंचायत पातळीवर मंगळवारी गावातून दवंडी पिटून पाणी उकळून गाळून थंड करून प्यावे असे सांगण्यात आले. विठा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास कळविण्यात आल्यानंतर बुधवारी त्यांचे पथक येथे घरोघरी फिरले असून त्यांनी या बाबत सर्वे केला आहे. राजूर येथील नळ पाणी पुरवठ्याचे पाणी दर महिन्याला पंचायत समिती अकोले येथे तपासणी साठी पाठवले जात असून त्यात दोष आढळून येत नसल्याचे समजले.
>
> **– पुष्पाताई निगळे,**
> सरपंच

कावीळ हा आजार दूषित पाण्यातून तसेच उघड्यावरील खाद्य पदार्थ, दूषित झालेल्या पालेभाज्या खाण्यात आल्यामुळे होत असल्याचे स्थानिका डॉक्टर बरोबर तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य पथक यांनी सांगितले.

# पं. बंगाल येथील हिंदुवरील हल्ल्याचा निषेध

### हिंदू परिषदेचे पाथर्डी तहसीलदारांना दिले निवेदन । कठोर कारवाईची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**
पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या हिंसाचारात तेथील हिंदू धर्मीयांवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत आहे. मुर्शिदाबाद व बंगाल मधील हिंदूंवरील होणाऱ्या हिंसाचाराला तेथील ममता बॅनर्जी सरकार जबाबदार आहे. याचे लोण संपूर्ण राज्यात पसरत आहे. पं. बंगाल राज्यात नेहमीच हिंदू समाजावर हिंदु उत्सवावर होणारे हल्ले भयानक असुन ते देशातील अंतर्गत सुरक्षेला धोकादायक आहे यामागे देश विघातक शक्तीचा व दहशतवादी संघटनांचा हात आहे. या हिंसाचाराला तेथील राज्य सरकार पाठीशी घालत आहे याचा निषेध करत पश्चिम बंगालमध्ये तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी पाथर्डी तालुका विश्व हिंदू परिषदेने राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन तहसीलदार डॉ उद्धव नाईक यांना देण्यात आले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे



पाथर्डी तालुकाध्यक्ष किशोर परदेशी, मुकुंद गर्जे, सोमनाथ बंग, प्रताप तांदळे, नानासाहेब पालवे, गणेश जवरे, दादासाहेब खेडकर, महेश बाहेती, प्रकाश बालवे, भास्कर दराडे, सोमनाथ दुधाने, ओम साखरे, अक्षय कुलकर्णी, सिद्धार्थ डोमकावळे, राहल टेके, नितीन इथापे, निखिल कराड आदीं उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुर्शिदाबादमध्ये मुस्लिम जमावाने वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने करताना हिंसक रूप धारण केले. मात्र, ही निदर्शने केवळ कायद्याविरोधात नसून हिंदूंवर थेट हल्ला असल्याचा आरोप विश्व हिंदू परिषदेने

केला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, या हिंसाचारात २०० पेक्षा अधिक हिंदूंची घरे व दुकाने लुटण्यात आली, शेकडोजण जखमी झाले, तीन नागरिकांचा निघृण खून करण्यात आला आणि अनेक महिलांवर अत्याचार झाले. परिणामी, सुमारे ५०० हिंदू कुटुंबांना स्थलांतर करावं लागलं. या पार्श्वभूमीवर परिषदेकडून पश्चिम बंगाल सरकार व मुख्यमंत्री ममता बॅनर्जींवर जोरदार टीका करण्यात आली. पश्चिम बंगालमध्ये तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करावी, गुप्तचर यंत्रणांकडून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, कायदा-सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या सुरक्षा दलांना पूर्ण नियंत्रण द्यावे, बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांविरोधात तात्काळ मोहीम राबवावी आणि सीमारेषेवर सुरक्षा वाढवावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ अकोलेत कँडल मार्च

## पाकिस्तानचे प्रतिकात्मक दहन करत हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांना वाहिली श्रद्धांजली

**● अकोले । वीरभूमी-**

काश्मीर मध्ये पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला हे पाकिस्तानचे षड्यंत्र असून पाकिस्तान दहशतवादी राष्ट्र असून त्याच्या या कुरापती नेहमीच चालू असतात त्याच्या बद्दल गावागावात तिरस्कार आणि निषेध सुरू आहे आता आपण सर्वांनी एकीने राहत त्याला उत्तर दिले पाहिजे असे आ. डॉ. किरण लहामटे यांनी म्हटले आहे.

ते बोलताना पुढे म्हणाले की, देशात काही दिवसापासून शांतता होती.पण ही शांतता भंग करण्याचे काम पाकिस्तानने केली असून धर्मा धर्मात वाद लावून हिंदू मुस्लिम संघर्ष कायम राहिला पाहिजे यासाठी पाकिस्तान नेहमी कुरघोड्या करीत असतो. पाकिस्तान हा भाऊ म्हणण्याच्या लायकीचा नसून त्याच्या या कृतीला आपल्या देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री निश्चितच उत्तर देतील यात शंका नाही.ते एक चांगलं पाऊल उचलत आहे, असे ही ते म्हणाले.

काश्मीर मध्ये पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला यात अनेक निरपराध नागरिक मृत्यूमुखी पडले. या घटनेच्या निषेधार्थ आज अकोलेकरांनी बसस्थानक परिसरात सायंकाळी अकोले शहरात कँडल मार्च काढत या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली तर अंतकवाद्यांच्या व पाकिस्तानच्या प्रतिकात्मक प्रतिमेचे दहन करीत निषेध केला. यावेळी राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.

आज सायंकाळी अकोल्यात जोरदार निदर्शने करीत पाकिस्तानच्या या कृत्याचा व भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यात आला. तर पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. यावेळी माधव तिटमे, राजेंद्र नाईकवाडी, प्रमोद मंडलिक, भाऊसाहेब आभाळे, राहुल ढोक, सदाशिव साबळे, शाहिदभाई फारुकी, आरिफ तांबोळी, हेमंत दराडे, नवाज बागवान, सचिन शेटे, पीयूष पंजाबी, सोमनाथ नवले, मच्छिंद्र मंडलिक, महेश नवले, यशवंत आभाळे, वसंतराव मनकर, संजय वाकचौरे, प्रा. बाळासाहेब शेटे, लक्ष्मण आव्हाड, मंगेश कराळे, बाळासाहेब वडजे, संदीप शेणकर, आयज शेख सर, शकील बागवान, गोकुळ वाघ, शांताराम गजे, प्रा. बी. एम. महाले, रोहित बर्वे, सचिन देशमुख, डॉ.अनिल वाघ, मुकुंद लहामटे, निखिल जगताप, अक्षय आभाळे, हभप दीपक महाराज देशमुख, रामदास पांडे, दत्ता शेणकर, सागर चौधरी, मोसीन शेख, सचिन



ताजने, फत्तु सय्यद, परशुराम शेळके यांच्यासह मुस्लिम समाज बांधव, विविध राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित कार्यकर्ते, नागरिक यांनी मनोगते व्यक्त करीत या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करीत पाकिस्तानच्या या कृत्याचा संताप व्यक्त केला. व दहशतवाद्यांना शिक्षा झाली पाहिजे आणि पाकिस्तानचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी यावेळी केली.

# संजीवनी इंजिनिअरिंगच्या सहा अभियंत्यांना सॅप कोर्समुळे एक्सपावुंड टेक्निवो व झेन्सर टेक्नॉलॉजिज मध्ये नोकऱ्या

## सॅप कोर्स ठरतोय विद्यार्थ्यांसाठी संजीवनी







**● कोपरगाव । वीरभूमी-**

कोणत्याही शाखेच्या इंजिनिअरींगची पदवी असली आणि त्यात आधुनिक कंपन्यांच्या नविन तंत्रज्ञानानुसार एखादा अधिकचा अल्प कालावधीचा कोर्स केलेला असला तर चांगल्या पगाराची नोकरी मिळणे सोपे होते. हा निष्कर्ष संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने काढला आणि त्यानुसार संजीवनीने सॅप (सिस्टिम्स, ॲप्लिकेशनस् अँड प्रॉडक्टस् ईन डेटा प्रोसेसिंग) या बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनीशी सामंजस्य करार केला आणि सॅपचे प्रशिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण घेत असतानाच दिले. या कोर्समुळे एका पाठोपाठ एक कंपनी नवोदित अभियंत्यांची नोकरीसाठी निवड करीत आहे. अलिकडेच एक्सपावुंड टेक्निवो व झेन्सर टेक्नॉलॉजिज या कंपन्यांनी संजीवनीच्या एकुण सहा अभियंत्यांची नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे सॅपचा कोर्स विद्यार्थ्यांसाठी संजीवनी ठरत आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की एक्सपावुंड टेक्निवो या सॅप तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या कंपनीने अंतिम वर्षातील मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या वैभव बंडू फेपाळे, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या वरद सुदाम साबने, ओम ऋषिकेश सिध्दा व रोहित दत्तात्रय बुळे यांची निवड केली आहे. झेन्सर टेक्नॉलॉजिज या सॉफ्टवेअर आणि सेवा कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या गौरी बाबासाहेब चांदर व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या ऋतिका आण्णासाहेब जाधव यांची निवड केली आहे.

आपल्या पाल्याला चांगली नोकरी मिळावी या विष्वासाने पालक आपल्या पाल्यांना संजीवनीमध्ये शिक्षणासाठी दाखल करतात. पालकांचा विश्वास सार्थ करण्यासाठी संजीवनीचे प्राद्यापक वेगवेगळे उपक्रम राबवितात. यामध्ये नियमित अभ्यासक्रमाबरोबरच जापनीज, कोरियन व जर्मन भाषांचे प्रशिक्षण, मुलाखतींचा सराव, कंपनी निहाय अधिकचे प्रशिक्षण, नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांचे अभ्यास दौरे, उद्योग जगतातील तज्ञ व्यक्तिंची मार्गदर्शनपर भाषणे, व्यक्तिमत्व विकासाचे उपक्रम इत्यादींचा समावेश असतो. अशा या संजीवनी पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांची साथ असेल तर ते हमखास यशस्वी होतात. या सर्व प्रयत्नांमुळे संजीवनीच्या माध्यमातुन दरवर्षी एक हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यामध्ये नोकऱ्या मिळत आहेत, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी निवड झालेल्या सर्व नवोदित अभियंते व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# ढवळपुरी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जलपात्राचे वाटप व बक्षीस वितरण

**● पारनेर । वीरभूमी-**

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील प्राथमिक आश्रमशाळेच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या अंतर्गत आयोजित विविध पर्यावरणीय दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस व जलपत्राचे वाटप सामाजिक वनीकरण विभागाच्या वनक्षेत्रपाल वैशाली भलावी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संदीप महांडुळे, वनरक्षक लखन शिंदे, प्रशांत फुलोरे, रिंकु इरोळे, योजना प्रमुख शिक्षक लतिफ राजे, कविवर्य रामदास भालेराव आदी उपस्थित होते.



राष्ट्रीय हरित सेने अंतर्गत प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी येथे विविध पर्यावरणीय दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, सायकल रॅली आदींचे आयोजन करण्यात आले होते. याच्या बक्षीस वितरण प्रसंगी वैशाली भलावी म्हणाल्या की, मानवाने भरपूर प्रगती केली आहे मात्र त्याच मानवाला स्वतः च्या अस्तित्वासाठी विविध पर्यावरणीय दिन साजरे करण्याची वेळ आली आहे. कारण मानवाने भूतकाळात केलेल्या चुका आहेत. यासाठी आपल्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. मुख्याध्यापक संदीप महांडुळे म्हणाले की, आमच्या प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी येथील विद्यार्थी पर्यावरण संरक्षण बाबतीत अगोदरच सावध आहेत. वर्षभर विविध पर्यावरणीय दिन प्रत्यक्ष साजरे केले जातात.

प्रास्ताविकात शिक्षक लतिफ राजे म्हणाले की पर्यावरणीय दिनानिमित्त दरवर्षी अनेक उपक्रम राबविले जातात. यात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार यात सहभागी करून घेतले जाते. यात विद्यार्थ्यां बरोबरच सर्व शिक्षकही सहभागी होतात. याप्रसंगी शिक्षक भावना वाघ, संगिता मोरे, वसंत काळे, प्रशांत पादिर, देवका पायमोडे, सनी काळे, कृष्णा धुमाळ, आप्पासाहेब पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक राजाराम वाघ यांनी केले. तर आभार लतिफ राजे यांनी मानले.

प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी येथे राष्ट्रीय हरित सेने अंतर्गत वर्षभर विविध स्पर्धा घेण्यात येतात. यातील विजयी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते. यावेळी चालू वर्षी कडक उन्हाळा असल्याने मुठभर दाना - घोटभर पाणी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मातीच्या जलपात्रांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना घराच्या परिसरात, झाडांवर पक्षांसाठी दानापाण्याची व्यवस्था करण्याबाबत सांगण्यात आले.

# निळवंडे धरणास दिवंगत मंत्री मधुकरराव पिचड यांचे नाव द्यावे

**● अकोले । वीरभूमी-**

निळवंडे धरणाच्या निर्मितीत माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे सर्वात जास्त योगदान असून आधी पुनर्वसन मग धरण असा पॅटर्न निळवंडेच्या रूपाने चर्चेत आला. निळवंडे धरणास मंत्री मधुकररावं पिचड यांचे नाव द्या अशी मागणी भाजप जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून केली.

मुंबई येथे मंत्रालयात नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, अकोले एजुकेशन संस्था सचिव सुधाकर देशमुख, अकोले मंडल अध्यक्ष राहूल देशमुख, उपस्थित होते.



निळवंडेच्या निर्मितीस ५० वर्षे लागली, मधुकर पिचड यांची राजकीय कारकिर्द ७२ च्या दुष्काळानंतर सुरू झाली. १९९० च्या दशकात प्रत्यक्ष धरण बांधण्यास सुरूवात झाली. २०२३ ला कालव्यातून पाणी वाहिले अन् धरण पूर्णत्वास गेले. पिचड यांची राजकीय कालखंड व निळवंडे निर्मितीची कालावधी सारखाच, निळवंडे निर्मितीत पिचड यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्यामुळेच चार कालव्यांचे धरण अशी ख्याती आशिया खंडात निळवंडेची झाली आहे. संगमनेर-राहाता तालुक्यातील अनेक वर्षे तहानलेली गावे पाण्याखाली आली असून ही गावे आता बागायती होताना दिसताहेत. तसेच संगमनेर येथे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही निवेदन देत निळवंडे धरणास दिवंगत मंत्री मधुकरराव पिचड यांचे नाव देण्यात यावे या मागणीचे निवेदन दिले.

# गर्भगिरी पर्वतरांगांतील वणव्यात वाचलेल्या झाडांना जय हिंद फाऊंडेशनकडून टँकरने पाणी

**● नगर । वीरभूमी-**

पाथर्डी तालुक्यातील कोल्हारजवळ असलेल्या गर्भगिरीच्या पर्वतरांगेत लागलेल्या भीषण वणव्यात मोठ्या प्रमाणावर जंगल जळून खाक झाले आहे. लोहसर ते कोल्हार दरम्यान सुमारे ६ ते ७ किलोमीटरचा परिसर या आगीत उद्ध्वस्त झाला असून, अनेक झाडे, औषधी वनस्पती, पशु-पक्षी आणि वन्यजीवांचा दुर्दैवी अंत झाला आहे.



या संकटाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत जय हिंद फाउंडेशनने पुढाकार घेत वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली आहे. फाउंडेशनने गर्भगिरीतील वाचलेल्या झाडांना पाणी देण्याचे काम हाती घेतले असून, निसर्गाला पुन्हा एकदा सावरण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमासाठी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, रामेश्वर पालवे, लखन पालवे, रामा नेटके आदी स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष डोंगरात जाऊन श्रमदान केले. त्यांनी पाण्याच्या टँकरद्वारे डोंगरातल्या झाडांना पाणी दिले.

शिवाजी पालवे म्हणाले की, गर्भगिरीसारख्या निसर्गसंपन्न पर्वतावर पुन्हा पुन्हा वणवे लागणे ही चिंतेची बाब आहे. ही आग नैसर्गिक की मानवनिर्मित, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे. निसर्गाचे हे नुकसान म्हणजे आपल्याच भविष्यासाठी खड्डा खोदण्यासारखे आहे. वणव्यात फक्त झाडेच नव्हे, तर त्या झाडांवर अवलंबून असणाऱ्या अनेक पक्ष्यांचे घरटे, प्राण्यांची आश्रयस्थाने नष्ट झाली आहेत. आज निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. प्रत्येक डोंगर, टेकडी, जंगल आपलेच आहे, हे लक्षात ठेवून आम्ही या झाडांना पाणी देण्याचे कार्य सुरू केले आहे. यासाठी गावकरी, युवक, विद्यार्थी यांनीही पुढे यावे. निसर्ग संवर्धनासाठी सरकारी यंत्रणांना सहकार्य करुन माणसाने निसर्गरक्षणाचा संकल्प घेतला, तरच आपण हे वैभव पुन्हा उभे करू शकतो, असे त्यांनी सांगितले.